सकाळ ★★, गुरुवार, २७ ऑक्टोबर २०११

# विद्या प्रतिष्ठान देणार लष्कराला अभियंते

**बारामती, ता. २६ :** मानाच्या भारतीय स्थलसेनेमध्ये आता बारामतीकर अभियंते कार्यरत होणार आहेत. विद्या प्रतिष्ठानच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील पदवीधारकांना भारतीय डिफेन्स सर्व्हिसेसमध्ये अधिकारी बनण्याची संधी महाविद्यालयाच्या प्रयत्नांमुळे प्राप्त होणार आहे. प्राचार्य डॉ. एस. बी. देवसरकर यांनी याबाबत माहिती दिली.

भारतीय स्थलसेनेमध्ये अभियंत्यांच्या ऑफिसर्स पदांच्या भरतीसाठी स्थलसेनेच्या डायरेक्टोरेट जनरल ऑफ रिक्रुटिंगची निवड समिती विद्या प्रतिष्ठान अभियांत्रिकी महाविद्यालयास १ नोव्हेंबर रोजी भेट देणार आहे. कॅम्पस प्लेसमेंटच्या माध्यमातून या महाविद्यालयातील; तसेच बारामती परिसरातील विविध महाविद्यालयांमधील चारशेहून अधिक विद्यार्थ्यांच्या प्रथम टप्प्यातील मुलाखती ही निवड समिती घेणार आहे. त्यानंतर आणखी दोन टप्प्यांमध्ये वेगळ्या परीक्षा होणार आहेत. या परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट स्थलसेनेमध्ये विविध विभागांत अभियंता म्हणून काम करण्याची संधी मिळणार आहे. भारतीय स्थलसेनाच चांगल्या अभियंत्यांच्या नियुक्तीसाठी थेट महाविद्यालयातून येण्याची बारामती परिसरातील ही पहिलीच वेळ असून, यासाठी विद्या प्रतिष्ठानचा पुढाकार महत्त्वाचा ठरणार आहे.

नुकत्याच झालेल्या निवडप्रक्रियेतून या महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांची थेट निवड झालेली असून, देशाच्या संरक्षणात असलेल्या स्थलसेनेत विद्या प्रतिष्ठानचे दोन विद्यार्थी कार्यरत होत आहेत ही बाब आमच्या दृष्टीने अभिमानास्पद आहे, असे डॉ. देवसरकर यांनी नमूद केले. या निवड प्रक्रियेत मदत व्हावी, या उद्देशाने राष्ट्रीय कॅडेट कोअर (एनसीसी) सुरू करण्याचाही संस्थेचा विचार असल्याचे त्यांनी सांगितले.